# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 10/12/2019 (मंगळवार)
# (दुपार)

---

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर पिपळा डाक बंगला वार्ड नं– 01 येथे दिनांक 08/12/2019 ते दिनांक 09/12/2019 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश वामनराव कूभलकर, वय 35 वर्ष, रा. पिपळा डा.बंगला यांच्या पानठेल्याचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडून आत प्रवेश करुन 1) 23 गोल्ड सिगारेटचे पॅकेट किंमती 2760/–रु. , 2) क्रश सिगारेटचे 7 पॅकेट किमती 1460/–रु., 3) देसाइ बिडीचे 6 पॅकेट किंमती 2500/–रु. व 4) एफएम रेडीयो कि. 400 रु व नगदी 500/–रु. असा एकुण कि. 7,620/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ जानूसिंग जाधव हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील मौजा मौजा पाटनसावंगी बायपास रोड येथे दिनांक 09/12/2019 चे 17.30 वा. फिर्यादींच्या जाऊ नामे– सौ.संगीता गनपत भोयर, वय 45 वर्ष, रा. इटनघोटी हिच्या सोबत पायदळ पाटनसांवगी वरून इटनघोटी येथे डांबरी रोडवरून जात होत्या. दरम्यान समोरून येनाऱ्या ट्रक क्र आरजे–17/जि.ए.7854 चा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे व हयगयीने चालवून सौ. संगीता गनपत भोयर यांना धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग.भा.वर्षा सूधाकर भोयर, वय 40 वर्ष, रा. इटनघोटी ता.सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304(अ) भादंवी. तसेच सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. फूलेकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर